-२१ प्रधान लेखाशिर्ष "००२९, जमीन महसूल"
खालो नवीन उपशिर्ष निर्माण करणे.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:एनएपी-१०८८/ प्र.क्र. १२७५ल-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ६ जानेवारी १९९०.

पहा: १] शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एनएपी-१०८८/प्र.क्र. १२७५/ ल-२ दिनांक १२-१०-१९८८.
२] शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एनएपी १०८८/प्र.क्र. १२७५ ल-२ दिनांक १२-१२-१९८८.

निर्णय:

शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एनएपी १०८८ प्र.क्र. १२७५ ल-२, दिनांक १२-१०-१९८८ अन्वये जमिनीच्या अकृषिक वापरासाठी परवानगी देताना वापरावयाची पध्दत विहित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांनी जमिनीच्या अकृषिक वापरासाठी परवानगी मिळण्याबाबतच्या अर्जाचा नमुना व माहितीपत्रक छापून घेवून अर्जदाराला देताना माममात्र रु. १/- शुल्क घ्यावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. अशा जमा होणाऱ्या रकमा प्रधानशिर्ष "००२९, जमीन महसूल" या खाली दाखवाव्या लागतील. परंतु या बाबींसाठी वरील प्रधानशिर्षाखाली नविन उपशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे. म्हणून अर्जदाराकडून अर्जाच्या किंमतीच्या स्वरूपात जमा होणारी रक्कम दाखविण्यासाठी पुढील प्रमाणे नविन उपशिर्ष उघडण्यात येत आहे.

प्रधानशिर्ष "मागणी क्रमांक ००२९ जमीन महसूल"
गौणशिर्ष "८०० इतर जमा रकमा"
नविन उपशिर्ष "अठरा] बिनशेती परवानगीसाठी करावयाच्या अर्जामुळे मिळणाऱ्या रकमा".

२. जिल्हाधिकाऱ्यांनी हे नविन निर्माण केलेले उपशिर्ष विचारात घेऊन सुधारित आठ मासिक अहवाल त्वरित पाठवावे. तसेच पुढील वर्षात अपेक्षित जमा रकमांबाबत आवश्यक ती माहिती पाठवावी.

३. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ९४७/अर्थ सं.४ दिनांक १६-१२-१९८९ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

सही/-xxx
[त्रि.शं. कर्वे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

क्र. कार्या/मह/३/१०/३९

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी दि१८-१-१९९०.

प्रतिलिपी:- १] तहसीलदार [सर्व] यांजकडे माहितीसाठी व जरूरत्या पुढील तजविजीसाठी रवाना. २] उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांजकडे माहितीसाठी ३] अकृषिक परवानगी लिपीक जिल्हाधिकारी कार्यालय ४] लेखाशाखा.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी करिता.

गो/-१८/१.